ISSN - No. 2319-9318

*Peer Reviewed International Research Journal*

UGC Approved

# VIDYAWARTA


## *Special Issue.*

Ashti Taluka Shikshan Prasarak Mandal's

# Arts,Commerce and Science College, Ashti

Tal.Ashti, Dist.Beed (MS)

Accredited by NAAC B++ Grade with 2.78 CGPA,
ISO 9001:2015, Green Audited College



**Interdisciplinary National Conference on**

## Recent Trends in Social Sciences & Commerce

27th February 2018

## PUBLIC ADMINISTRATION & POLITICAL SCIENCE

Organizer
Dr. S. R. Nimbore
Principal

Ashti Taluka Shikshan Prasarak Mandal's

**Arts, Commerce & Science College, Ashti, Dist.Beed**

Accredited by NAAC B++ Grade with 2.78 CGPA, ISO 9001:2015, Green Audited College

---

**Organized by**

# One Day Interdisciplinary National Conference on

# Recent Trends in Social Sciences and Commerce

**Tuesday, 27th February, 2018**

**Principal & Organizer**

Dr. S.R. Nimbore

**Convenors**

Dr. B.S. Waghmare

Prof. R.E. Bharudkar

**Published By**

**Harshwardhan Publication Pvt. Ltd.**

**Limbaganesh, Dist.Beed**

ISSN: 2319 9318

**Publisher:**
Smt. Archana Rajendra Ghodke
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
Limbaganesh, Dist. Beed- 431126
Cell- 9850203295

© **Dr.S.R. Nimbore**

**Organising Committee:**

Dr. S.G. Gopane (Vice Principal)
Prof. D.P.Mundhe
Dr. B. S. Waghmare
Dr. B.N. Mutkule
Dr. S.M. Wandhare
Prof. N.N. Nanwate
Prof. M.K. Shirsath
Prof. R.S. Satbhai
Prof. R.E. Bharudkar
Prof. M.C. Talware
Prof. J.M. Pathan
Dr. R.T. Sontakke
Dr. A.B. Shinde
Prof. S. A. Mutkule
Prof.Smt.S.M.Khude
Dr. S.A. Wangujare

**Printer:**
Shivam Digital, Ashti Dist.Beed
Ashish Press, Ashti Dist.Beed

**Type Setting:**
Shri. T.K. Redekar
Shri. S.S. Nikalje

**Edition:**
First Edition - February 2018

# Index

## Public Administration


| Sr. No. | Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Historical Background of Good Governance | Dr. S.B. Kurhe | 1 |
| 2 | Good Governance in Indian Context | Dr. P.R. Tharkar | 8 |
| 3 | Good Governance and the indian scenario | Dr. Bharat Gore | 12 |
| 4 | Recent Trends In Public Administration: Performance Management Of Civil Servants | Dr. Smt. J.T. Birdavade-Bhandwaldar | 15 |
| 5 | Panchayati Raj System in India | Dr.Argade Ambadas | 20 |
| 6 | E-Governance towards Good Governance | Gayal Maroti Ramrao | 25 |
| 7 | E-Administration: Impact on Various Sectors | Prof. Dr. Deepak S. Phulari | 28 |
| 8 | Governance and Good Governance: A Conceptual Perspective | Hatkar jalba umaji | 31 |
| 9 | Human Right and Social Justice | Mr. Gawande Sunil Laxman | 35 |
| 10 | Good Governance in India | Mr. Vaibhav Ramu Shendage | 37 |
| 11 | लोकनिवड दृष्टीकोन | प्राचार्य डॉ.अजय पाटील | 40 |
| 12 | सुशासन - अपेक्षा व वास्तव | डॉ. शंकर लेखने | 44 |
| 13 | ई-प्रशासन (E-Administration) | डॉ. चव्हाण बी. एम. प्रा. खेडकर व्ही. एल. डॉ.हजारे ए.पी. | 46 |
| 14. | ई-प्रशासना समोरील आव्हाने | डॉ. जीवन सुदामराव गंगणे | 51 |
| 15 | तणाव व्यवस्थापन | डॉ.बी.आर.कत्तुरवार | 54 |
| 16 | ई-प्रशासनाचा उद्देश आणि त्याचे फायदे | प्रा.डॉ. कहाळेकर सी. एम. | 58 |
| 17 | सुशासन एक विश्लेषण | प्रा. अशोक नारायण गायकवाड | 61 |
| 18 | राज्य मानवी हक्क आयोग आणि आजची स्थती | डॉ. संजय भालेराव, सुनिल लक्ष्मण गावंडे | 63 |
| 19 | जागतिकीकरण आणि सु-शासनाचा आकृतिबंध | डॉ. भालेराव जे.के. | 65 |
| 20 | पर्यावरण संरक्षणासाठी प्रशासकीय व्यवस्था | डॉ. एन. पी. कुडकेकर | 68 |
| 21 | सुशासन एक पारदर्शक शासन | डॉ. घव्हाण संजय संदिपान | 72 |
| 22 | लोकप्रशासनातील लोकसहभागाच्या भूमिकेच आणि वाढत्या महत्त्वाचा प्रशासकीय अभ्यास | प्रा.डॉ.गोरे अशोक लक्ष्मण | 74 |
| 23 | नवलोकप्रशासन : प्रशासनाची बदलेली भूमिका | डॉ. सोनकांबळे ए.सी. | 77 |

| | | | |
|---|---|---|---|
| 24 | सु शासनः भारतातील वाटचाल | डॉ.फोले संभाजी कोंडबाजी | 79 |
| 25 | ई - प्रशासन : सद्यस्थिती आणि आव्हाने | डॉ.रमेश वाघमारे | 82 |
| 26 | जागतीक तापमानवाढ कारणे व परिणाम | प्रा. चावरे एम. व्ही. | 86 |
| 27 | जनसहभागिता एक समस्या | प्रा. डॉ. व्ही. पी. सांडूर | 88 |
| 28 | सुशासन | डॉ. स्मिता का. मरवाळीकर | 91 |
| 29 | लोकसेवेतील सुधारणेसाठी नवीन लोक व्यवस्थापन दृष्टिकोनाचा स्विकार | महेश उमाशंकर थळपते | 94 |
| 30 | नवीन लोकप्रशासन एक अभ्यास | खंडाळकर पद्मा अशोकराव | 97 |
| 31 | भारतातील पर्यावरण संरक्षणामध्ये न्यायव्यवस्थेची भुमीका एक चिकीत्सक अभ्यास | भोजने दिपाली भास्कर | 100 |
| 32 | ग्रामविकासातील लोकसहभागाच्या भूमिकेचे अध्ययन | गंगाधर रामकृष्ण भोसले | 106 |
| 33 | ई- प्रशासन | सवाई प्रियंका भास्करराव | 109 |
| 34 | पर्यावरण व्यवस्थापन आणि प्रशासन | जया रमेश दाभाडे | 112 |
| 35 | नवीन लोकप्रशासन का उद्भव एंव विकास | चव्हाण अनिता सुकलाल | 116 |
| 36 | प्रशासकीय संस्कृती एक चिकित्सक अभ्यास | डॉ. गजानन देवराव चिट्टे वाड | 119 |
| 37 | नवलोक व्यवस्थापन | संतोश गुट्टे | 124 |
| 38 | लोकनिवड दृष्टिकोनाचा एक चिकित्सक अभ्यास | राहूल सुरेश निकम | 126 |
| 39 | ई-प्रशासनाचे नवे पर्व : एक प्रशासकीय अभ्यास | मिसाळ कल्पना भास्कर | 129 |
| 40 | नवलोकप्रशासनाची संकल्पना | डॉ. भगवान वाघमारे | 133 |
| 41 | नव लोक व्यवस्थापन संकल्पना | डॉ.गजभारे सुरेश बळीराम | 137 |
| 42 | Good Governance in Public Administration | Todkar Someshwar Parmeshwar | 139 |
| 43 | Challenges of Good Governance | Dr. Magar S. R. | 142 |
| 44 | Recent Trends In Pub-Administration & Role Of Indian Constitution | Prof. Jadhav V.S. | 145 |
| | **Political Science** | | |
| 45 | The Role of Government Programmes in Women's Empowerment | Dr. Suhas R. Morale<br>Mr. Pissanu Horakul | 149 |
| 46 | Human Rights and Human values it's Need to surviving for Human Life | Dr. Farooqui Q.M. Younus | 153 |
| 47 | Injustice of the Caste System | Prof. M.B. Gaikwad | 158 |

| | | | |
|---|---|---|---|
| 48 | Panchayat Raj Institution in India | Dr. Jayram S. Dhawale | 160 |
| 49 | Women And Panchyat Raj Institution | Dr. Suhas R. Morale<br>Mr. Pakkapon Jantaraoj | 164 |
| 50 | Political Development and Modernization | Dr. Vinod V. Bairagi | 167 |
| 51 | Indian's foreign policy and diplomacy with Different Countries for National Interest | Shaikh Gafoor Ahmed | 180 |
| 52 | Women Empowerment | Ranee Jagannathrao Jadhav | 185 |
| 53 | Human Right and Type | Shivaji Gorakshanath Dhokane | 188 |
| 54 | Human Rights in Indian Constitution | Dr. R. K. Kale | 192 |
| 55 | Marginal Status Of Women And Need Of Empowerment - A Review | Prof AnujaA.Kastikar<br>Dr. SangeetaS.Sasane198 | 196 |
| 56 | Womens Human Rights & Women Empowerment | Dr. S.N. Satale | 199 |
| 57 | भारतीय राज्यघटना आणी मानवी हक्क | प्रा.डॉ गालफाडे ए.बी. | 202 |
| 58 | मानवी हक्क आणि जागतीक शांतता | प्रा. डॉ. ढोबळे डी. बी. | 205 |
| 59 | पंडित नेहरूंचे अण्वस्त्र धोरण | प्रा.डॉ.माधव कदम | 208 |
| 60 | महिला सबळीकरणामध्ये प्रशासनाची भूमिका | डॉ. नामानंद गौतम साठे | 214 |
| 61 | जी एस टी (वस्तु व सेवा कर) आणि राज्या समोरील अव्हाने | डॉ.साहेब साठोड<br>गणेश मारोती कचरे | 217 |
| 62 | मानवी हक्क व नैतिकता | प्रा. डॉ. अनिल दत्तू देशमुख | 219 |
| 63 | पंचायतराज व्यवस्था आणि ग्रामपंचायतीतील महिला आरक्षण | काळे आर.के. | 222 |
| 64 | विविध क्षेत्रांतर्गत महिलांचे सबलीकरण | प्रा. सतिश मैलारी कटके | 226 |
| 65 | मानवी हक्कांची समीक्षा | डॉ. खडके ज्ञानेश्वर सुखदेव | 231 |
| 66 | मानवी हक्क : स्वरुप व स्वयंसेवी संस्था | प्रा. डॉ. महेश मोटे | 233 |
| 67 | महिला सबलीकरण | प्रा. डॉ. शिवाजी गोविंदराव दिवाण | 238 |
| 68 | मानव अधिकार आणि भारताची भूमिका | प्रा.डॉ.मुंडे एम.आर. | 241 |
| 69 | भारतातील पंचायतराज पद्धत | प्रा.डॉ. पोकळे के.जी. | 244 |
| 70 | शितयुध्दोत्तर काळात भारताचे परराष्ट्र धोरण | प्रा.डॉ. रामकिशन लोमटे | 248 |
| 71 | मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना | प्रा.ज्ञानेश्वर बनसोडे डॉ. महादेव गव्हाणे | 251 |
| 72 | मानवी हक्क व मानवी हक्काची पायमल्ली करणारे घटक | प्रा.डॉ.रजनी अ. बोरोळे | 254 |

| | | | |
|---|---|---|---|
| 73 | सार्क संघटना आणि भारताचे परराष्ट्र धोरण | प्रा.डॉ. भुजंग विठ्ठलराव पाटील | 257 |
| 74 | महिला सबलीकरणात भारत सरकारचे योगदान | डॉ.रेखा रामनाथ बने | 260 |
| 75 | ग्रामराज्य, ग्रामसभा यांविषयीचा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टीकोन | प्रा.तेजस्विता अविनाश रणश्रृंगारे | 262 |
| 76 | ग्रामराज्य, ग्रामसभा यांविषयीचा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टीकोन | प्रा.किरण नामदेव गायकवाड | 265 |
| 77 | भारताचे सद्यःस्थिती मधील परराष्ट्र धोरण | डॉ. संजय गव्हाणे<br>रासवे बालासाहेब मच्छिंद्र | 267 |
| 78 | महिला सबलीकरण घटनात्मक तरतुदी व कायदे | प्रा.एस.के.तांदळे | 270 |
| 79 | मानवी  हक्क आणि भारतीय संविधान | प्रा.डॉ. अर्जुन उबाळे | 273 |
| 80 | भारताचे परराष्ट्र धोरण आणि संबंध | प्रा. गजानन हनवते | 278 |
| 81 | मानवी हक्काचे प्रकार, मानवी हक्क संकल्पना | प्रा. खेडकर व्ही.एल.<br>डॉ. हजारे ए. पी. | 281 |
| 82 | महिला सबलीकरण | प्रा.उत्तम सोनवणे | 285 |
| 83 | भार तीय पंचायतर ाज व्यवस्था | प्रा. कमलाकर  शर द  इंगळे | 289 |
| 84 | भारताचे पूर्वेकडील परराष्ट्र धोरण | प्रा. आर. ई. भारुडकर | 292 |
| 85 | महिला शिक्षण विषयक धोरण आणि महिला सबलीकरण | कु.ऋतुजा पांडूरंग बावचकर | 296 |
| 86 | आधुनिक भारतासमोरील प्रादेशिक आव्हान | आकाश शेषराव बांगर | 299 |
| 87 | भारतातील पंचायतराजचे बदलते स्वरूप | डॉ.संजय गव्हाणे<br>जाधव श्रीराम दामला | 303 |
| 88 | महिला सबलीकरण : वास्तव आणि समस्य | परतवाघ मोहन भानुदास | 305 |
| 89 | मानवी हक्क | महेश वसंत कुलकर्णी | 309 |
| 90 | भारतातील मानवी हक्क आणि वास्तव परिस्थिती | श्री.नरवाडे बालाजी मारोतराव | 312 |
| 91 | मानव अधिकाराची सामाजिक उपयोगिता | डॉ. बालासाहेब माणिकराव टकले | 316 |
| 92 | भारत व शेजारील राष्ट्रांचे संबंध | पवार विश्वनाथ हणमंतराव | 319 |
| 93 | India and China Relation and Balancing Strategy : An analysis | Mr. Nikam Rajaram Digambar | 321 |
| 94 | भारतीय राजकारणातील बदलते प्रवाह | राजरत्न शं. गवई | 323 |
| 95 | महिला सबलीकरण : धर्म व समान नागरी कायदा | सुनिल दामोधर भारोडकर | 327 |
| 96 | संयुक्त राष्ट्र संघटनेतील  भारताची भूमिका | खंडेराव हरिभाऊ काळे | 329 |
| 97 | भारताचे परराष्ट्रीय धोरण | प्रा. डॉ. जे.टी. कांबळे | 332 |

# महिला सबलीकरण : वास्तव आणि समस्य

**परतवाघ मोहन भानुदास**
पीएच. डी. संशोधक
स्वामी रामानंद तिर्थ
मराठवाडा विद्यापीठ नांदेड

**प्रस्तावना :-**

आजच्या युगामध्ये महिलांचे सबलीकरण हे एखाद्या पडलेल्या स्वप्नासारखे वाटत आहे. कारण कुटुंबातील एखादा साधा निर्णय ही घेण्याचा स्त्रिला अधिकार नाही स्त्री - पुरुष हे संसाररुपी रथाची दोन चाके आहेत. अशी उपमा दिली आहे. पण पुरुषरुपी चाक स्त्रीरुपी चाकाला आपले वर्चस्व गाजवून मनाप्रमाणे वाटेल तिकडे घेवून जात आहे. महिला सबलीकरण ही आधुनिक काळातील संकल्पना समजली जात असली तरी तिची पाळेमुळे फार जुनी आहेत. भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात स्वतःला परिवर्तनवादी समजणा-या पाश्चिमात्य देशात पण स्त्रियांनी आपले हक्क मिळविण्यासाठी संघर्ष केलेला आहे. संपूर्ण जगावर राज्य करणा-या इंग्लंडमध्ये महिलांना १९५८ मध्ये मतदानाचा अधिकार मिळाला आहे. तसेच अमेरिकेतील बेट्टी फ्रिडन या स्त्रीने १९६६ मध्ये " नॅशनल ऑर्गेनायझेशन ऑफ विमेन ''या नावाची संघटना स्थापन करुन महिलांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य केले आहे. स्वातंत्र्यापुर्वी भारतीय समाज व्यवस्थेमध्ये स्त्रियांना कसल्याही प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते. स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय व हलाखीची होती. स्त्रियांना त्या काळात शिक्षण देणे हे पापकर्म समजले जाई, स्त्रियांना सती जावे लागे. त्या संदर्भात राजा राममोहन रॉय यांनी १८२९ मध्ये सतीबंदी कायदा करण्यास इंग्रजांना भाग पाडले. महात्मा फुलेंनी महिलांना शिक्षण देण्यासाठी १८४८ मध्ये पुण्यात मुलींची पहिली शाळा काढली. स्त्रीचा व्यक्तिमत्व विकास होण्यासाठी तिला पुरुषा इतक्याच मुक्त स्वातंत्र्याची अवश्यकता आहे. हा विचार जरी सर्वसंमत असला तरी आज एकविसाव्या शतकातल्या भारतीय स्त्रीला तेवढे हक्क व स्वातंत्र्य दिले जात नाहीत हे आजचे वास्तव आहे.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये स्त्री सबला झाली पाहिजे यासाठी शासन, न्यायव्यवस्था आणि परिवर्तनवादी संघटना मोठया प्रमाणावर कार्य करत आहेत. पण पुरुषी मानसिकता जोपर्यंत बदलणार नाही तोपर्यंत महिलांच्या समस्या आणि त्यांच्यावर होणारे अत्याचार कमी कसे होणार नाहीत. आज महिला प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर आहेत. पण त्या सुरक्षित नाहीत कारण दिल्लीमध्ये घडलेल्या निर्भया प्रकरणाने संपूर्ण देश हदरुन गेला. तसेच १३ जुलै २०१६ मधील अहमदनगर जिल्हयातील कोपर्डी येथील अत्याचाराची घटना काळीज पिळवटून टाकणारी व मानवजातीला काळीमा फासणारी आहे. अशा घटना घडू नयेत म्हणून शासन व न्यायव्यवस्था कठोर कायदे व कठोर शिक्षा करीत आहे. महिलांचे सबलीकरण करण्यासाठी शासनाने " द नॅशनल पॉलिसी फॉर द एम्पावरमेंट ऑफ विमेन ''हा कायदा २००१ मध्ये मंजूर केला आहे. या कायदयाच्या माध्यमातून स्त्रियांच्या स्थितीमध्ये परिवर्तन करण्याचे कार्य सुरु आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमि :-**

भारतीय स्त्रीयांच्या ऐतिहासिक पार्श्वभूमिकडे नजर टाकल्यास त्याद्वारे विविध बाबी लक्षात येतात. स्त्रियांना सामाजिक , धार्मिक , शैक्षणिक , आर्थिक क्षेत्रात कोणतेच स्थांन नव्हते हे लक्षात येते. स्त्री म्हणजे उत्पत्ती, स्त्री म्हणजे पूर्णत्व ही स्त्रीची महती आज संपूर्ण मानवजातीला पटलेली आहे. प्राचीन भारतीय समाज व्यवस्थेमध्ये स्त्रियांना अतिशय महत्वाचे स्थान होते. महाभारतामध्ये महिलांबद्दल असे म्हटले आहे की,

अर्ध्द भार्या मनुष्यस्य, भार्या क्षेष्ठतम : सखा।
भार्या मूल त्रिवर्गस्य भार्या मुल तरिष्यत ।।

पत्नी ही पुरुषाची अर्धांगीनी आहे. तीच श्रेष्ठ सखी आहे. पत्नीच धर्म, अर्थ, काम याचे मूळ आहे. असे असले तरी महिलांना पूर्ण स्वातंत्र्य होते असे म्हणता येणार नाही. कारण -....

पिता रक्षति कौमारे भ्रत्ता रक्षंति यौवने
पुत्राश्च स्थाविरे भावे न स्त्री स्वातंत्र्यमर्हती

" बालपणी वडिलांचा धाक,
लग्नानंतर नव-याचा धाक,

म्हतारपणी मुलांचा धाक,

बंधनातच होते स्त्रीयांचे आयुष्य खाक ''

अशी विरोधाभासी पध्दत त्या काळात होती. स्त्रिला पुरुषांपेक्षा कमी दर्जाचे स्थांन होते. भारतीय समाज व्यवस्थेमध्ये पुरुषच केंद्रस्थानीहोता. हिच परंपरा वर्षानूवर्षापासून चालत आलेली होती.

महात्मा गौतम बुध्दांच्या काळात हिंदू धर्मातील स्त्रीयांच्या बाबतीत असलेलल्या वाईट चालीरिती, प्रथा, परंपरा बाजूला सारुन ज्ञान विज्ञानावर आधारलेल्या बौध्द धम्माचा उदय आणि प्रसार झाला. त्यामुळे सर्वांसाठी ज्ञानाचे दरवाजे खुली करण्यात आली. महिलांना भिक्षूणी बनवून स्त्री – पुरुष समानता प्रस्थापित केली होती. पण नंतरच्या काळात मनु या ऋषीने मनुस्मृती या ग्रंथानुसार स्त्री मुक्तीकडून स्त्रियांची बंधनाकडे वाटचाल सुरु केलेली आपल्याला दिसून येते. पुर्वी भारतात मातृसत्ताक कुटुंब पध्दती होती. ती नष्ट करुन स्त्रीला असलेले स्वातंत्र्य हिरावून घेवून तिने चुल आणि मुलच पहावे, तीला चारभिंतीच्या आत ठेवून उपभोगाची वस्तू म्हणून स्त्रीकडे पहिले जात होते. स्त्रियांना कुटुंबात अतिशय हिनतेची वागणूक दिली जात असे. मुलीचा जन्म म्हणजे कुटुंबावर संकट मानले जाई. मुलीचा बालवयातच विवाह केला जाई, पुरुषांच्या वयाची मर्यादा नव्हती. मुली लवकरच विधवा होत असत. पुर्नविवाहाची परवानगी नव्हती, सती प्रथा, केशवपण , पडदा पध्दत आणि स्त्री व अस्पश्यांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. अशा अनेक प्रकारची बंधने मनुस्मृती या ग्रंथांच्या माध्यमातून स्त्रियावर लादली होती. आजच्या काळामध्ये स्त्री स्वातंत्र्याच्या चळवळी, सामाजिक संस्था, राज्यसंस्था शिक्षणाच्या माध्यमातून बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करत आहेत. समाज सातत्यांने बदलत आहे. त्या बदलाचे पडसाद महिलांच्याही जीवनमानावर होत आहेत. यातून त्यांची भूमिका, महत्वाकांक्षा आणि दृष्टीकोन यामध्ये मोठा बदल होत आहे. भारतीय पुरुषप्रधान संस्क्रतीत महिलांकडे त्यांच्या अधिकारांकडे , व्यक्ति स्वातंत्र्याकडे, पाहण्याचा दृष्टीकोन मात्र अजूनही संकुचितच आहे. काही पुरुषांची मानसिकता मात्र स्त्रियाबदल बदललेली आहे. म्हणून स्त्रिया प्रगतीकडे वाटचाल करत आहेत.

**महिला सबलीकरणाची संकल्पना व योगदान :-**

पुरुषांने मी पणा सोडून महिलांना माणुस म्हणून जगण्याची संधी देऊन, स्त्रिला व्यक्तिमत्व विकास करण्यास प्रोत्साहन दयावे. तसेच स्त्रियांना “ भिक नको आहे , कोणाची दया नको आहे. तर त्यांना पुरुषांप्रमाणे समान संधी हवी आहे.” पावलो फ्रिरे यांनी सर्व प्रथम ही संकल्पना उपयोगात आणली,“महिलांना सबला करणे आणि त्यांना समान हक्क व संधी देणे हेच यामागील तत्व आहे.”

महिला सबलीकरण म्हणजे “ दुर्बलता नष्ट करणारी स्त्रीच्या शरीर मानव बुध्दीमध्ये स्वत्वाची जाणीव व स्वत : बद्दल जागरुकता निर्माण करणारी व त्या दृष्टीने स्वयंविकासासाठी प्रवृत्त करणारी एक संकल्पना होय.” लिंगभेदावर आधारीत विषम समाजव्यवस्था नष्ट करुन स्त्री – पुरुष समानतेवर आधारीत नवी व्यवस्था निर्माण करणारी ही आंतरराष्ट्रीय चळवळ आहे. ही चळवळ तळागाळा पर्यंत पोहचली पाहिजे.

भारतात इंग्रजांची सत्ता स्थापन झाल्यानंतर पाश्चात्य ज्ञान, संस्कती , आचार, विचार यांची ओळख झाली. इंग्रजांनी त्यांचे प्रशासन सुव्यवस्थित चालावे म्हणून भारतात शिक्षणाला सुरुवात केली. स्वातंत्र्य , समता आणि बुध्दिवाद याला महत्व आले. आणि सामाजिक परिवर्तनाला चालना मिळाली. महिलांवरील अन्याय दुर व्हावेत त्यांना समाजात पुरुषांच्या बरोबरीने स्थांन मिळावे म्हणून प्रयत्न करण्यात येवू लागले. महिलांना प्रथम शिक्षण दिले पाहिजे या हेतूने महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी पुण्यात १८४८ मध्ये पहिली मुलीची शाळा स्थापन केली. मुलींच्या शिक्षणासाठी अनेक प्रकारचा त्रास सहन केला.

पंडिता रमाबाई यांनी १८८९ मध्ये शारदा सदन, नावाची मुलीची शाळा काढली. मादाम कामा, मदर तेरेसा यांनी महिलांच्या उत्कर्षासाठी कार्य केले. भारताची पहिली महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी उत्कष्ट कार्य केले. कल्पना चावला पहिली अंतराळ वीर महिला ठरली. भारताची पहिली महिला राष्ट्रपती म्हणून प्रतिभाताई पाटील यांनी संधी मिळाल्यामुळे चांगले कार्य करुन दाखविले आहे. पण अशा बोटावर मोजन्याइतक्याच महिला आहेत. म्हणून शासनाने महिला सबलीकरणाच्य माध्यमातून स्त्रियांचा सन्मान रोजगार, आरोग्य, शिक्षण इ. बाबतीत प्रश्न १९७५ मध्ये निर्माण झाले होते. या प्रश्नांची चर्चा सार्वजनिक विचारपीठावरुन होऊ लागली. स्त्री चळवळीत शोषणमुक्तीचा आदर्शवादही वारंवार मांडला गेला स्त्री मुक्तीची , सामुहिक संघर्षाची परिभाषा सोडून सबलीकरणाच्या परिभाषेला मान्यता दिली. १९८० च्या दशकात खा. ऊ. जा. धोरणामुळे ही संकल्पना पुढे आली. महिलांचे सक्षमीकरण म्हणजे आध्यात्मिक , सामाजिक , राजनैतीक , शैक्षणिक आणि आर्थिक सामर्थ्य

वाढविणे गरजेचे आहे. परंतु आजच्या युगात तर महिलांना शिक्षण घेण्यासाठी बाहेर जाणेही कठीण झाले आहे. देशाला १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले आहे. पण स्त्री २०१८ मध्येही मुक्त पणे आपले कार्य करु शकत नाही. कारण तीच्यावर अत्याचार करुन मारुन टाकले जात आहे. तीला स्वावलंबी होऊ द्या. तीला या जगामध्ये मुक्तपणे संचार करु दिला पाहिजे. पण ती आजही आपले जीवन दबावात, भयभित होऊन जगत आहे. स्त्रिला आजही अनेक समस्यांना तोंड दयावे लागत आहे.

**महिला सबलीकरणातील समस्या :-**

१. बालपणापासूनच मुलगा आणि मुलगी असा भेद करण्यापासूनच महिलांच्या समसेला सुरुवात होते. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा पण मुलीला पणती मानत नाहीत.

२. बालविवाहाची समस्या - कायद्याने जरी मुलीचे लग्नांचे वय १८ ठरविले असले तरी ग्रामीण भागातील बहुतांश मुलींचे लग्न हे बलवयातच केले जातात.मग तील संसारामध्ये अनेक समस्या भेडसावतात.

३. शिक्षणाचा अभाव - मुलींच्या शिक्षणाच प्रमाण ६० % आहे. स्त्रियांच्या नोकरीच प्रमाण ३० % आणि उच्च शिक्षणाच प्रमाण १२ % इंडिया टुडेच्या सर्वेक्षणातून पुढे आले आहे.

४. लौंगिक आधारे होणारी हत्या , ॲसिड हल्ले, लैंगिक छळ, लौंगिक शोषण, स्त्रियांच्या व्यापारात झालेली वाढ.

५. कायद्याचे अपयश.

६. अव्याय - अत्याचारात वाढीची समस्या.

७. दुहेरी भूमिकेचा ताण.

८. स्त्रीभ्रुणहत्येचे वाढते प्रमाण ही एक समस्या महिला सबलीकरणामध्ये प्रामुख्याने निर्माण झालेली आहे. २०११ च्या शिरगणतीनुसार १०००, पुरुषांमागे ९१४ स्त्रिया ही भारताची सरासरी आहे.

९. महिलांना स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये ५० % आरक्षण मिळाले आहे पण शासनात महत्वपूर्ण पद मिळण्यास मदत झाली आहे. परंतू त्या पदाच्या अधिकाराचा वापर त्यांचे घरचे कर्ते पुरुषच करतात त्यामुळे महिलांना स्वता : चा निर्णय घेता येत नाही.

१०. महिला सबलीकरणासाठी बरेच कायदे निर्माण केले आहेत ; पण त्यांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत नाही. ' एंटी रेप लॉ' आजही संसदे मध्ये राजकारणाचा बळी होत आहे.

महिला सबलीकरणाच्या बाबतीत ज्या समस्या आहेत जे अडथळे आहेत, ते पुढील काळात उपाययोजनाद्वारे दूर होणे गरजेचे आहे.

**सारांश :-**

स्त्री सबलीकरण ही आजच्या समाजाची अत्यंत आवश्यक गरज बनली आहे. महिलांना सक्षम करुनच आपण समाज आणि देशाला बलवान शक्तीशाली करु शकतो. महिलांचा सहभाग त्यांना संरक्षण त्यांची आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, उन्नती त्यांच्या क्षमतांचे संवर्धन यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करावे लागणार आहे.

महिलांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देणे गरजेचे आहे. महिला सबलीकरणासाठी सरकार कडून करण्यात येणारे प्रयत्न प्रशंसनीय आहेत पण पुरेशे नाहीत. न्यायव्यवस्थेत आवश्यक ते बदल करण्यात यावेत. महिलांकडे सन्मानाने पाहणारी व व्यक्तिश : हल्ले होणार नाहीत, अशी न्यायव्यवस्था निर्माण झाली पाहिजे. वैवाहिक कायदे, घटस्फोट कायदे, विनयभंग कायदे, लैंगिक अत्याचार कायदे यात योग्य तो बदल झाला पाहिजे. लोकशाहीत महिलांना हक्क आणि अधिकार देताना तिचे सामर्थ्य वाढविले पाहिजे तरच स्त्रीचे सबलीकरण होईल. भारतीय राज्यघटनेमध्ये स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान अधिकार दिले आहेत परंतू व्यवहारात राजकीय नेतृत्व आणि सर्वोच्च संवैधानिक संस्थामध्ये सहभाग या बाबत स्त्रियांना आपले राजकीय अधिकार उपयोगात आणण्यासाठी संधी योग्य प्रमाणात दिली गेली नाही. असे आढळते स्त्रीयाकडे पाहण्याचा परंपरागत दृष्टीकोन हा तिला उपभोग्य वस्तू समजणे लैगिक सुख देणारी वस्तू म्हणून पहाने दुय्यम दर्जा देणे ही मानसिकता बदलली पाहिजे.

राष्ट्रपिता महात्मा जोतीबा फुले संपूर्ण जगातील मानव जातीला असा संदेश देतात की, " स्त्री अथवा पुरुष, जे एकंदर सर्व गावेच, प्रांताचे, देशाचे व खंडाचे स्त्री आणि अथवा कोणत्याही धर्मातील स्वतःच्या संबधात स्त्री आणि पुरुष या

 ISSN – 2319 9318

उभयतांनी , अथवा सर्व स्त्रियांनी अथवा पुरुषांनी , एकमेकांत , एकमेकांची कोणत्याही प्रकारची आवड निवड ( भेदभाव) न करता या भूखंडावर आपले एक कुटुंब समजून एकमताने एकजुटीने एकमेकांशी सत्य वर्तन करुन रहावे.''

**संदर्भ सूची :-**


१) भारत में महिलाएँ - सिंह राजबाला सिंह माधुबाला.

२) ब्राहमणवाद - जेमिनी शारदा भाऊराव (जॅमिनी कडू).

३) मनुस्मृतीच्या समर्थकांची संस्कती - डॉ. आ. ह साळूंखे.

४) भारताचे शासन आणि राजकारण - प्रा. शेखहासम, डॉ. जोगेंद्र गवई.

५) नारी शिक्षा एवं सशक्तीकरण - चितरंजन ओंझा.

६) महिला सक्षमीकरण - आधार पब्लिकेशन, अमरावती टक्स.

७) भारतीय समाज संरचना आणि समस्या - आगलावे प्रदीप.

८) भारतीय समाज प्रश्न आणि समस्या -आगलावे प्रदीप.

९) बुध्द आणि त्याचा धम्म - डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

१०) भारतीय समाज — चंद्रकांत खंडागळे.

११) इंडिया टुडे - २००९.

१२) भारतीय स्त्री जीवन — गीता साने.

१३) भारतीय राजकारणातील स्त्रिया - डॉ. मोहिनी कडू.

१४) महिला सबलीकरण - शुभांगी गोटे (गव्हाणे).

१५) भारताची जनगणना - २०११.


❁

This issue of the journal provides an opportunity to the academicians, consultants, scholars, Researchers and Policy makers with variety of backgrounds and experiences to exchange their views on the concerned topics. The papers on 'Recent Trends in Social Sciences and Commerce', share new ideas and research results to find solutions on the practical challenges in the encountered areas. The methods, data, information, knowledge and innovative ideas in the papers are useful for the students, teachers and social workers in the subject of Commerce, Sociology, Public Administration, Economics, History and Political Science.











**Publisher & Owner.**
Archana Rejendra Ghodke
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post-Limbaganesh Tq.Dist.Beed.
Pin-431126 (Maharashtra)
Cell. 9850203295

ISSN-2319 9318

Ashish Press, Ashti
Mob. 9423054000